# <u>नियमित दिवाणी दावा क्र.१२१/२०१८ मधील निशाणी क्र. २९ वरील आदेश</u>

(CNR NO. MHRG14-000553-2018)

१. प्रतिवादी क्र. १ ने सदरचा अर्ज दाव्यास मुदतीच्या कायदयाची बाधा येत असल्याबाबत प्राथमिक मुद्दा काढण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीने अर्जास निशाणी ४० वर म्हणणे देवून अर्जास जोरदार हरकत घेतली आहे. वादीचे पुढे असे कथन आहे की, सदरचा अर्ज हा खोटा, खोडसाळ व बनावट असून तो कायदयात टिकणारा नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज, म्हणणे तसेच उपलब्ध कागदपत्रे वाचून पाहीली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हा ठरावाकरीता, हक्क प्रस्थापनेकरीता, कुलमुखत्यारपत्र रद्द करुन मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ने याकामी प्राथमिक मुद्दा काढण्याविषयी दिलेला आहे. सदरचे कामी हे प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी कैफियत व म्हणणे दाखल केले असून अदयापि प्रतिवादी क्र. २ यास समन्स व नोटीसची बजावणी झालेली नाही. तसेच वादीचा याकामी तुर्तातुर्त मनाईचा अर्ज अदयापि सुनावणीसाठी प्रलंबित आहे. याकामी न्यायालयाने अदयापि मुद्दे काढलेले नाहीत. दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश १४ प्रमाणे न्यायालयाने मुद्दे काढले असतील व त्यापैकी एखादा मुद्दा चालविल्यास दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याची शक्यता असल्यास सदरचा मुद्दा प्राथमिक मुद्दा म्हणून चालविता येईल. त्यामुळे याकामी

अदयापि मुद्दे काढले नसल्याने प्रतिवादी क्र. १ चा अर्ज मंजूर होणेस पात्र नाही. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |
|---|

WALI NILESH MALAKAPPA
Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA
Date: 2023.01.30 13:27:17 +0530

ठिकाण – उरण. (एन.एम.वाली)

दि.२७/०१/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.